पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

## -:प्रेस नोट:-

दिनांक २१/०६/२०२६

### <u>अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई अंतर्गत दाखल गुन्हयातील १२७५ किलो वजनाचा जप्त अंमली पदार्थ व ५६०६ कोडीन मिश्रीत बॉटल्स् किं.अ.६६५ कोटी रूपयांचे अंमली पदार्थ नाश केलेबाबत.</u>

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत दाखल गुन्हयातील १२७५ किलो वजनाचे कोकेन, मेफेड्रॉन, गांजा, चरस, हेरॉईन, इफेड्रीन पवाडर, हायड्रो गांजा व ५,६०६ कोडीन मिश्रीत बॉटल्स् असा अंमली पदार्थ एकुण किं.अ. ६६५ कोटी रूपयांचा जप्त अंमली पदार्थ मुद्देमाल दिनांक २०/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त रिसस्टेनेबीलिटी लिमीटेड, प्लॉट नं - पी ३२ ॲन्ड पार्ट,एम.आय.डी.सी. तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र येथे आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून बंदिस्त भट्टीत जाळून नाश करण्यात आला आहे.

<u>अशा प्रकारे अंमली पदार्थ मुक्त समाज बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई पोलीस दल हे सतत प्रयत्नशील आहे.</u>

सदरची यशस्वी कार्यवाही मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई देवेन भारती तसेच मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे यांचे मार्गदर्शनाखाली घटक स्तरीय ड्रग डिस्पोजल कमिटीचे अध्यक्ष - मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) डॉ. मनोज कुमार शर्मा, सदस्य - मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्ण कान्त उपाध्याय, सदस्य - मा. पोलीस उप आयुक्त (अंमली पदार्थ विरोधी कक्ष) पौर्णिमा चौगुले-श्रींगी तसेच न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना यांचे प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये प्रभारी पोलीस निरीक्षक (भांडारगृह) सचिन पाटील, स.फौ.क्र.३०९५९/शेडगे, स.फौ.क्र.३३३४९/चाळके, पो.ह.क्र.९६०९१७/पडळकर, म.पो. शि.क्र.११२४७५/जेठे, पो.शि.क्र.१४१४१०/जाधव यांनी सदर अंमली पदार्थाची नाश प्रक्रिया पार पाडली आहे.




INCINERATOR PLANT-1
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय
अंतर्गत
DRUG FREE MUMBAI
जप्त अंमली पदार्थ
मुद्देमाल नाश कार्यक्रम
२०२६
दिनांक: २०/०५/२०२५
Re Sustainability Limited